# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

**Website- www.sic.maharashtra.gov.in**

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार
क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र-४२९/२०२३/जळगाव.

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री राजधर संतोष महाजन, रा.माळी वाडा, मारोती मंदीराजवळ, मु.पो.ता.एरंडोल, जि.जळगाव.४२५१०९ | उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, एरंडोल, ता. एरंडोल, जि.जळगाव. |

सुनावणी दिनांक ११/०६/२०२५

तक्रारदार यांनी दि. ३०/०६/२०२३ रोजीच्या अर्जान्वये, "प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२७/०४/२०२३ रोजी आदेश देण्यात आला तरी जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही. अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसांच्या विहित मुदतीत माहिती न देणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) नुसार दंड व कलम २० (२) नुसार शास्ती ची कार्यवाही करावी. शारीरिक व मानसिक त्रासापोटी मला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) (ख) नुसार रूपये ५,००० (पाच हजार रूपये) नुकसान भरपाई देण्यात यावी. सोबतच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम, नागरिकांची सनद, नागरी सेवा अधिनियम, राज्य माहिती आयोगचे गाइडलाईन, शासनाचे शासन निणर्य परिपत्रके, अधिसूचना, न्यायालयीन आदेश/निणर्य इत्यादिचे उलंघन केले प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांच्यावर भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १६६ ए ( लोकसेवक यांनी बेईमानीपूर्वक कार्य करणे) कलम १८८ ( शासकीय व वैध आदेशांची अवहेलना करणे) कलम २१७ ( कायद्याच्या निर्देशांची अवमानना करणे) नुसार एफआईआर दाखल करुन फौजदारी कार्यवाही करुन फौजदारी कार्यवाही करणेसंबंधी शासनाकडे शिफारस करावी." असे तक्रारदार यांनी नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८ अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

२) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि. ११/०६/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी सर्व पक्षकार उपस्थित होते.

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ०८/०३/२०२३ रोजीच्या मुळ माहिती अर्जान्वये दि.१५/०६/२००६ ते ०८/०३/२०२३ पर्यंत या कालावधीतील, जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

*"नागरिकांनी आपणाकडे सादर केलेल्या सर्व माहिती अधिकार अर्जाच्याच वरील कालावधीतील प्रतिलिपी अवलोकनासाठी तयार ठेवाव्यात. २) जनमाहिती अधिकारी यांनी 'अशा' अर्जदारांना दिलेल्या उत्तराच्या फक्त प्रतिलिपी अवलोकनासाठी तयार ठेवाव्यात. ३) ज्या अर्जदारांनी माहितीची गरज नाही /माहिती मिळाली /समाधान झाले/तक्रार नाही इ. अशा आशयाचे पत्र किंवा लेखी विधा अर्जावर / रजिस्टर इ. ज्या ठिकाणी लिहून दिली असतील तर त्याच्या सुध्दा*

*अवलोकनासाठी ठेवाव्यात. ४) कलम २५ (३) (क) (ख) (ड) नमुना विवरण १ कलम २५ (३) क) (ख) (ड) नमुना विवरण २ कलम २५ (३) (ग) नमुना विवरण ४ (विवरण क्रमांक ३ रद्द करण्यात आलेले आहे.) कलम २५ (३) (च) नमुना विवरण ५ याप्रमाणे नमुना विवरण दरमहा वरिष्ठांकडे पाठविण्यावे कायदेशीर बंधन आहे. त्यास्तव त्याच्या प्रतिलिपी तपासणी / अवलोकन निरीक्षणासाठी तयार ठेवाव्यात."*

*तसेच, जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झालेने तक्रारदार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक. १२/०४/२०२३ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे.*

४) सुनावणीवेळी उपस्थित जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास दि. ०९/०६/२०२५ च्या पत्रान्वये प्रस्तूत प्रकरणी अहवाल सादर केला असून त्यात असे नमूद केले आहे की,

"श्री. राजधर संतोष महाजन यांना अवलोकनासाठी कार्यालयात बोलविले असता त्यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन करुन माहितीबाबत समाधान झाले बाबत लेखी स्वरुपात या कार्यालयास कळविले आहे. समवेत त्याची प्रत माहितीसाठी जोडलेली आहे. तरी महोदय वरील तक्रार निकाली काढण्यात यावी."

तसेच, तक्रारदार यांनी दि.०९/०६/२०२५ रोजी आयोगास लेखी निवेदन सादर केले असून त्यात असे नमूद केले आहे की, *"उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये मी वरील प्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने मी मागीतलेली माहितीचे अवलोकन करून दिले असून मिळालेल्या माहितीने माझे समाधान झाले असून त्याबाबत माझी काही एक हरकत नाही. तरी माझा तक्रार अर्ज निकाली काढणेत यावा ही विनंती."*

सबब, तक्रारदार यांच्या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

प्रस्तूत तक्रार क्र.४२९/२०२३/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

जावक क्र. ९६८

01 JAN 2026